दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक ४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.५ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पुणे-मुंबई महामार्गावर भीषण अपघात; २ ठार १ गंभीर

**दै.रायगड नगरी । पुणे**

कामशेत गावच्या हद्दीतील जुना मुंबई महामार्गावरील कामशेत खिंडीत सोमवारी पहाटे अडीच वाजल्याच्या सुमारास कारच्या भीषण अपघातात कार मधील दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. राजेंद्रकुमार देवेंद्रकुमार जैन (वय ४४, रा. कळवा, ठाणे) व औतार गुरुदयाल सिंग सेहेरा (वय ५०,रा. कोपरी, ठाणे) असे अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. तर नितेशकुमार देवेंद्रकुमार जैन हे या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत.

मुंबई कडून पुण्याच्या दिशेने निघालेल्या लाकूड वाहतूक करणार कंटेनर हा कामशेत खिंड उतरत असताना चालकांचे नियंत्रण सुटल्याने पुणे लेनवर पलटी झाला. व कंटेनर मधील सर्व लाकडे मुंबई लेनवर पडली होती. त्यावेळी पुणे कडून मुंबईकडे निघालेली मारुती कार ही महामार्गावर पडलेल्या लाकडांना वेगात येऊन आदळल्याने कार मधील पुढे बसलेले राजेंद्रकुमार देवेंद्रकुमार जैन व औतार गुरुदयाल सिंग सेहेरा यांचा या अपघातात मृत्यू झाला. तर मागच्या सीटवर बसलेले नितेशकुमार देवेंद्र कुमार जैन हे या अपघात गंभीर जखमी झाले आहेत.

# भारताला एक नंबरची अर्थव्यवस्था बनविणे हाच सरकारचा उद्देश : ना.नितीन गडकरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**रायगड जिल्हयातील राष्ट्रीय महामार्गात ३२५ किलोमीटरने वाढ झाली असून गेल्या सात वर्षात रायगड जिल्ह्यात दहा हजार कोटी रुपयांची कामे मंजूर झाली असल्याची माहिती केंद्रीय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पनवेलमध्ये झालेल्या कार्यक्रमात दिली. देशाला सुखदायी आणि समृद्ध तसेच जगातील एक नंबरची आर्थिक व्यवस्था बनविणे हेच सरकारचे उद्देश असल्याचेही ना. गडकरी यांनी यावेळी अधोरेखित केले.**



केंद्र सरकार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या धोरणात्मक निर्णयामुळे पनवेल, उरण आणि खालापूर तालुक्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाच्या ठरणाऱ्या महत्वकांक्षी जेएनपीटी बंदर जोडरस्ता प्रकल्पाचा लोकार्पण, कळंबोली जंक्शन विस्तारीकरण आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पूर्वेकडील प्रवेशद्वाराचे भूमिपूजन नामदार नितीन गडकरी यांच्या हस्ते रविवारी सायकांळी झाले. त्याचबरोबर त्यांनी उरण-जेएनपीटी-चौक या नवीन महामार्गाची घोषणाही या कार्यक्रमात करत महाराष्ट्राच्या विकासासाठी आणखी एक महत्वाचे पाऊल उचलत महाराष्ट्राच्या विकासाला अधिक चालना दिली आहे.

वर्षानुवर्षे बिकट अवस्था असलेल्या जेएनपीटी-उरण ते पनवेल मार्गामुळे उरण आणि पनवेल तालुक्याच्या विकासामध्ये बाधा येत होती. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या आशीर्वादाने आणि भारतीय जनता पार्टीचे पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांच्या अथक प्रयत्नाने उरण आणि पनवेल तालुक्यातल्या जनतेला उत्कृष्ट आणि जागतिक दर्जाचा ३५०० कोटींचा रस्ता मिळाला. २०१४ मध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन झाले होते. या रस्त्याचे काम पूर्ण होऊन त्याचे लोकार्पण आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते संपन्न झाले. या महामार्गामुळे नागरिकांचा जेएनपीटी-उरण ते पनवेल, मुंबई असा प्रवास सुखकर आणि जलद झाला असून सोबतच अपघातांचे प्रमाण कमी झाले, तसेच व्यापार वृद्धिंगत होऊन विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली आहे. कळंबोली येथील जंक्शनच्या वाहतूक कोंडीतून प्रवाशांची सुटका व्हावी, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नाने कळंबोली जंक्शन विस्तारीकरण प्रकल्प कळंबोली, कामोठे आणि पनवेल वासियांना मिळाला आहे. वाहतूक कोंडीतून पनवेलकरांची मुक्तता करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना विनंती केली होती. व त्या संदर्भात पाठपुरावा केला होता. त्या अनुषंगाने ८०० कोटींचा कळंबोली जंक्शन विस्तारीकरण होणार असून त्याचे भूमिपूजन नामदार नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. सोबतच नवी मुंबई विमातळाचे पूर्व प्रवेशद्वार या ४०० कोटींच्या प्रकल्पाचे भूमिपूजन सुद्धा या सोहळ्यात पार पडले. उरण-जेएनपीटी-चौक या नवीन महामार्गाची घोषणा या कार्यक्रमात नामदार नितीन गडकरी यांनी केली. ना. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारला जाणारा, सागरमाला प्रकल्पामधून जेएनपीटी आणि एनएचआयकडून ३००० कोटी रुपये किमतीचा हा रस्ता रायगड जिल्हा आणि उरण मतदारसंघातील नागरिकांना महत्वपूर्ण अनोखी भेट आहे. जेएनपीटीतून बोरखार, चिरनेर, आपटा, गुळसुंदा, मोहपाडा, रसायनी ते चौक पर्यंत या आठपदरी होणाऱ्या रस्त्यामुळे रहिवाशांना पोर्ट अगदी जवळ येणार आहे. आणि त्यामुळे रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रालाही सुद्धा चालना मिळणार आहे. तसेच बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. जवळच मुंबईचा लखलखाट असताना सुद्धा हा सर्व परिसर विकासापासून दूर होता. या होणाऱ्या रस्त्यामुळे ती अडचण दूर होणार असून या आठपदरी रस्त्याची घोषणा सुद्धा नामदार नितीन गडकरी यांनी यावेळी केली. या एकूण प्रकल्पामुळे पनवेल, उरण आणि खालापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकास होणार आहे आणि त्याचा फायदा मोठ्या प्रमाणात नागरिकांना होणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ चिंचपाडा गाव येथे नामदार नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या समारंभास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, माजी पालकमंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदा म्हात्रे, महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी आमदार देवेंद्र साटम, पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, उद्योजक जे.एम. म्हात्रे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जेएनपीटी पोर्ट रोड, कळंबोली जंक्शन विस्तारीकरण जेएनपीटीचे डेप्युटी चेअरमन उमेश वाघ, नवी मुंबई विभाग अदानी पोटचे व्ही. के. शर्मा, अश्विन मुदगल, प्रशांत फेगडे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, अधिकारी, स्थानिक भूमिपुत्र आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा दूरदृष्टीकोन फक्त महाराष्ट्र, देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला ज्ञात आहे. त्यांच्या योजना नेहमीच आदर्श ठरल्या आहेत. आणि त्या अनुषंगाने देशाच्या नावलौकिकात भर पडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली काम करीत असतांना करायचे ते ठासून करायचे आणि नागरिकांच्या व देशाच्या हिताचेच करायचे हा त्यांचा हट्ट असतो. सामान्य माणसाप्रमाणे त्यांचा वावर असला तरी काम मात्र प्रभावशाली असते, त्यामुळे त्यांचे आभार मानण्यासाठी त्यांच्या आगमनाची उत्सुकता रायगड जिल्ह्याला लागली होती. यावेळी नामदार नितीन गडकरी यांचे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा देऊन स्वागत केले. तसेच त्यांनी रायगड जिल्ह्याच्या विकासाला मोठ्या प्रमाणात चालना दिल्याबद्दल नामदार गडकरी यांचे आभार मानले.

> माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आपले जवळचे मित्र आहेत, असे आवर्जून नमूद केले. तसेच जेएनपीटी पोर्ट रोड, कळंबोली जंक्शन विस्तारीकरण त्याचबरोबर जेएनपीटी ते चौक आठपदरी होणाऱ्या रस्त्याच्या महत्वपूर्ण कामासाठी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्यातून होत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. पनवेल पोर्ट आणि एअरपोर्ट चांगले असल्याशिवाय देश पुढे जाऊ शकत नाही. एक्स्पोर्ट होण्यासाठी अडचणी आहेत; पण येत्या काळात भारत सरकारतर्फे या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न आहे. एक्स्पोर्ट वाढला की देशाची प्रगती वाढते आणि प्रगती झाली की रोजगार वाढतो आणि प्रगती आणि रोजगार वाढला की, भारत देश आर्थिकदृष्ट्या सक्षम राष्ट्र होईल. आपल्याला सर्वांना मिळून या देशाला पुढे न्यायचे आहे. आपल्या सगळ्यांच्या मदतीने पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या स्वप्नातील आत्मनिर्भर व नवा भारत होईल. आज मुंबई, नवी मुंबई, जेएनपीटीचे जे दृश्य पाहायला मिळत आहे ते सुखद आणि आनंददायी आहे. ज्या ज्या अधिकाऱ्यांनी या प्रोजेक्टसाठी मदत केली, त्या सगळ्यांचे मी आभार मानतो.
>
> **नितीन गडकरी, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री**

## पेण मध्ये २ कोटींच्या व्हेल माशाची उलटी पकडली

### ५ आरोपी पेण पोलिसांच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पेण येथील सरकारी हॉस्पिटलच्या परिसरात संशयित इन्होवा क्रिस्टा गाडीतून व्हेल माशाच्या उलटीची विक्री करताना पेण पोलिसांनी ५ जणांना रंगेहाथ पकडले. त्यांना आज कोर्टासमोर हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील काही ठरावीक असणाऱ्या समुद्रांमधून व्हेल माशांची उलटी गोळा करून तीची तस्करी करीत असणा-या तस्करखोरांना अनेकदा पोलिसांनी अटक केली आहे. सदर व्हेल माशाची विक्री करणे हा कायद्याने गुन्हा आहे. मात्र तरीही या माशाच्या उलटीची तस्करी करून यामधून करोडो रुपये कमविले जातात. याच उद्देशाने व्हेल माशाच्या उलटीची विक्री पेण येथे होणार असल्याची माहिती पेण पोलिसांना मिळाली असता त्यांनी संपूर्ण शहरात नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू केली. दरम्यान ३ मार्चच्या रात्री १० वाजण्याच्या सुमारास पेण उपजिल्हा रूग्णालयाच्या परिसरात एम एच ४७ ए टी ८८७९ या इन्होवा क्रिस्टा गाडी संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी सदर गाडीची कसून तपासणी केली असता त्या गाडीत व्हेल माशाची अंदाजे २ किलो वजनाची उलटी सापडली. सदर उलटीची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जवळपास दिड ते दोन कोटी रुपयांच्या वर किंमत आहे.

या तस्करीत असणारे आरोपी विजय परदेशी, प्रेमविर सिंग रा. उत्तर प्रदेश, सदानंद मोरे रा. रत्नागिरी, अमोल राघो रा. नागपूर, अजय आबांवडे रा.सांगली अशा पाच आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्यावर वन्य जीव संरक्षण अधिनियम १९७२ अन्वये नुसार कलम ३९, ४४, ४९ (ब), ५७, ५१ सह भादवी कलम ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपींना आज पेण न्यायालयात हजर केले असता त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या घटनेचे अधिक तपास पेण पोलिस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक एम.जे.घाडगे या करीत आहेत.

## कर्जत उपविभाग महसूल कर्मचारी आज पासून बेमुदत संपावर

### कर्जत उपविभागातील ४१ कर्मचारी सहभागी

**दै.रायगड नगरी । कर्जत**



दोन वर्षांपासून पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याने रायगड जिल्ह्यातील शेकडो महसूल कर्मचारी आज सोमवार पासून बेमुदत संपावर केले आहेत. यामुळे जिल्ह्यातील, तालुक्यातील महसूल विभागातील कामकाज ठप्प झाले आहे.

राज्यातील महसूल विभाग आणि जिल्ह्यातील महसूल संघटनांनी २१ मार्च २०२२ पासून निदर्शने, काळ्या फिती लावून काम, एक दिवसाचा लाक्षणिक संप अशी आंदोलने केली आहेत.तरीही सरकार त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे. यामुळे आता महसूल कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपावर जाण्याचे हत्यार उपसले आहे.

तहसील कार्यालय, उपविभाग व जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सहाय्यकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असून महसूल सहाय्यक भरतीसाठी राज्य सरकारकडे वारंवार पाठपुरावा करून देखील भरती करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. यामुळे एका कर्मचाऱ्याला दोन ते तीन कर्मचाऱ्यांचे काम करावे लागत असल्याने त्यांच्यावर कामाचा ताण येत आहे.

शासन निर्णय महसूल व वन विभाग १० मे २०२१ अन्वये नायब तहसीलदार संवर्ग म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. त्यानुसार सर्व अव्वल कारकून

…/२

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे स्वागत

### उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई विद्यालयात उपक्रम परिवहन सेवेचाही शुभारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवे नोड येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई विद्यालय कार्यान्वीत झाले असून, सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली आहे. त्यानिमित्त विद्यालयामध्ये सोमवारी (दि. ४) स्वागत समारंभाचे आयोजन रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच विद्यालयाच्या परिवहन सेवेचाही शुभारंभ झाला.



उलवे नोड येथे नव्याने बांधण्यात आलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई विद्यालयात सोमवारपासून सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली आहे. त्यानिमित्त विद्यालयामध्ये येणार्या विद्यार्थ्यांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामध्ये नर्सरी ते सहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ आणि चॉकलेट देऊन स्वागत केले. यासोबतच या वेळी बसचे ही लोकार्पण लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोहळ्याला शकुंतला रामशेठ ठाकूर, विद्यालयाचे चेअरमन तथा पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच हेमलता भगत, शरद खारकर, एम. डी. खारकर, रयतचे सहाय्यक विभागीय अधिकारी शहाजी फडतरे, रोहिदास ठाकूर, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल कमिटी सदस्य निलेश खारकर, राजेश खारकर, विद्यालयाच्या प्राचार्या मुक्ता खटावकर, बाळासाहेब कारंडे, सचिन खारकर, श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनिअर कॉलेजच्या प्राचार्या साधना डोईफोडे आदी उपस्थित होते.

## मंत्रिमंडळात होणार फेरबदल?; महाविकास आघाडीच्या हालचालींना वेग

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या काही महिन्यापासून राज्यात महाविकास आघाडीत धुसफूस असल्याचं समोर येत होते. गृहमंत्र्यांच्या कारभारावर शिवसेना नाराज असल्याचंही बोललं जात होते. तर विधानसभा अध्यक्षपदाचा निर्णय अर्थसंकल्पीय अधिवेशनातही झाला नाही त्यामुळे काँग्रेसही नाराज आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यात मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याची माहिती समोर आली आहे. याच महिन्यात मंत्रिमंडळात फेरबदल होतील अशी सूत्रांची माहिती आहे.

येत्या काही दिवसांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि काँग्रेसचे नेते यांच्यात बैठक होणार आहे. या बैठकीत मंत्रिमंडळ फेरबदलावर चर्चा होण्याची शक्यता आहे. यात महाविकास आघाडीतील काही खातेबदल होणार असल्याचंही सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे गृहखाते शिवसेनेने घ्यावं अशी मागणी सेना नेत्यांकडून वारंवार केली जात आहे. त्यामुळे गृहखात्याची अदला-बदल होणार का? हे पाहणं गरजेचे आहे.

८ एप्रिलला राज्यात महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक होईल. या बैठकीला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, शरद पवार, काँग्रेसचे नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांच्यासह इतर नेते उपस्थित असतील. नाना पटोले यांनी विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यापासून हे पद रिक्त आहे. मागील २ अधिवेशनात विधानसभा अध्यक्षपदाची निवड करण्यात आली नाही. त्यामुळे या बैठकीत विधानसभा अध्यक्षपदावरही तोडगा निघण्याची शक्यता आहे. शिवसेनेचे भास्कर जाधव हे सभागृह चांगल्या प्रकारे चालवू शकतात असं

…/२

## नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन लवकरात लवकर आपला मालमत्ता कर भरावा : आयुक्त गणेश देशमुख

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेतील मालमत्ताधारकांच्या मालमत्ता करांवरील शास्ती मध्ये सवलत देण्याचा आदेश आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी आज(३एप्रिल) जाहीर केला. या आदेशामध्ये मालमत्ता करांवरती १०० टक्क्यांपासून ते २५ टक्क्यांपर्यंतची सवलत जाहीर करण्यात आली आहे.

सन्माननीय नगरसेवक, विविध सेवा भावी संस्थांचे सन्माननीय पदाधिकारी, विविध सोसायट्यांचे सन्माननीय पदाधिकारी, सन्माननीय पत्रकार व सन्माननीय नागरिक यांनी वेळोवेळी मालमत्ता करावरील शास्तीमध्ये सवलत देण्याबाबत किंवा शास्ती आकारण्याचा कालावधी वाढविण्याबाबत अनेक वेळा मागणी केली होती. पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको नोडमध्ये प्रथम व पूर्वलक्षी प्रभावाने कर आकारणी होत आहे. तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मालमत्ता करांवरील शास्तीमध्ये सवलत देण्याची मागणी होत होती.

…/२

# रमजान महिन्याच्या प्रारंभी रोजेदारांना महावितरणची सलामी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील विद्युतपुरवठयाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून पोलादपूर महावितरणचे अभियंता सूद यांच्या बदलीचे प्रयत्न होण्यासाठी ग्राहकांना वेळीअवेळी महावितरणकडून विद्युतपुरवठा खंडीत ठेऊन त्रास दिला जात आहे. पवित्र रमजान महिन्याच्या प्रारंभीच सोमवारी दुपारपासून संध्याकाळपर्यंत पोलादपूर तालुक्यातील विद्युत पुरवठा खंडित ठेऊन महावितरणने रोजेदारांची कडक परिक्षा घेतल्याने तालुक्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पोलादपूर तालुक्यात एप्रिल आणि मे महिन्यांमध्ये पावसाळयापूर्वी दुरूस्तीच्या कामांच्या सबबीखाली गेली काही वर्षे विद्युतपुरवठा खंडीत करण्याची पध्दत येथील अभियंता सूद यांनी अस्तित्वात आणली. यावेळी सुरूवातीला त्यांना कर्तव्यदक्ष म्हटले जाऊ लागले असताना सूद यांनी कर्तव्यदक्षतेचा अतिरेक करीत पावसाळयापूर्वी आणि पावसाळयामध्येदेखील विद्युतपुरवठा खंडीत करून त्यांच्याच प्रशंसकांचा पचका केला होता. गेल्या अनेक वर्षांपासून अभियंता सूद हे त्यांची बदली पोलादपूर येथून होण्याच्या प्रयत्नात असून त्यांनी अनेक प्रभावी व्यक्तींना जाच करून सूद यांनी वरिष्ठांकडे तक्रार होण्यासाठी प्रवृत्त केले आहे.

गेल्या दोन वर्षांपासून सूद यांनी स्वत:विरोधातील तक्रारदारांची संख्या वाढवून बदलीचे प्रयत्न जोरदार सुरू केले आहेत. यापध्दतीने सूद यांची काही केल्या वरिष्ठांकडून बदली होत नसल्याने सूद यांनी कोंढवीतील घरकुलासाठी विद्युतमीटरची मागणी असताना दुसरीकडचे विजमीटर बसवून मुंबई येथील सत्ताधारी आमदारांचा रोषही ओढवून घेतला आणि आमदारांकडून सूद यांच्या बदलीच्या मागणीऐवजी पक्षाच्या स्टाईलमध्ये जाण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रश्न निकाली काढला. काही ग्राहकांचे विद्युतमीटर दुसरीकडे शिफ्ट करण्याची मागणी असताना पैसे भरून घेऊनही त्रास देण्याचा प्रयत्न केला तर काहींना विद्युतबिलाची रक्कम शून्य पैसे पाठविल्यानंतर पुढील बिल मोठे येण्याची धास्ती दिली आहे. या बाबत ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी मोबाईलवरून संपर्क करणाऱ्यांचे मोबाईल नंबर ब्लॉक करून सूद यांनी स्वत:विरोधातील वातावरण चिघळत ठेवले आहे.

अवाजवी विद्युतबिलांच्या आकारणीमुळे गेल्या वर्षी सूद यांच्याविरूध्दचे उपोषण रहित झाले तरी त्यांच्या अनागोंदी कारभाराविरोधात होणारा जनक्षोभ महावितरणकडून विचारात घेतला जात नसल्याने आता बदलीच्या प्रयत्नांमध्ये सातत्य व वाढ करून अभियंता सूद यांनी रमजान महिन्याच्या प्रारंभीच सोमवारी दुपारी दुसऱ्या रोजावेळी रोजेदारांना कडक उन्हाळयात पंख्याच्या हवेची झुळूकही लागू नये, अशा तऱ्हेने १ वाजल्यापासून साडेपाच वाजेपर्यंत विद्युतपुरवठा खंडीत करण्यात आला. यानंतर अर्धा तास विद्युतपुरवठयामध्ये कमीअधिक दाबाच्या पुरवठयामुळे चढउतार दिसून आला. यामुळे पोलादपूर तालुक्यातील रोजेदार तसेच मुस्लीम समाजाच्या लोकवस्त्यांसह उन्हामुळे अंगाची काहिली सहन करणाऱ्या सर्वच ग्राहकांकडून महावितरणच्या या विद्युतपुरवठा खंडीत करण्याच्या भुमिकेबाबत संताप व्यक्त केला गेला.

## सहा पैकी एकाची केली पोलिसांनी धरपकड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गोमांस विक्री करण्याच्या उद्देशाने गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करून त्यांच्या अवयवांचे तुकडे करणाऱ्यांची तळोजा पोलिसांनी धरपकड केली. या धरपकडीदरम्यान एक व्यक्ती पोलिसांच्या हाती लागला असून इतर पाच जण पळून गेले. या कारवाईत पोलिसांनी ३ बैल, १ गाय आणि २ वासरूंना ताब्यात घेऊन त्यांची सुटका केली.

तळोजा गावातील नोफिल हुस्नेन पटेल यांच्या घराजवळ काही व्यक्ती गोमांस विक्री करण्याच्या उद्देशाने गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करत असल्याची माहिती तळोजा पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे व त्यांच्या पथकाने तळोजा गावात नोफिल पटेल यांच्या घराजवळ पहाणी केली असता, सदर ठिकाणी सहा व्यक्ती हातात सत्तुर, चाकू घेऊन एका गोवंश जातीच्या जनावराची कत्तल करताना आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांची धरपकड केली असता, सर्वजण त्याठिकाणावरून पळून गेले, मात्र त्यातील इम्रान अब्दुल अजीज पटेल (४३) हा पळून जाताना खाली पडल्यामुळे तो पोलिसांच्या हाती लागला.


## ग्रामपंचायत वाकडी

**ता.पनवेल, जि.रायगड**

### जाहीर सूचना २०२२/२३

दि.०४/०४/२०२२

ग्रामपंचायत वाकडी, ता.पनवेल, जि.रायगड हे ग्रामपंचायत वाकडी हद्दीतील पुढील विकासकामाकरिता इच्छुक ठेकेदारांकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदार व अनुभवी ठेकेदार यांनी ग्रा.पं.कार्यालयात कामाच्या दिवशी दि.०४/०४/२०२२ ते ११/०४/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा स्वीकारण्यात येतील. शक्य झाल्यास दुसऱ्या दिवशी दुपारी १.०० वाजता किंवा मासिक सभेच्या दिवशी उपस्थित ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निधी स्त्रोत |
|---|---|---|---|---|
| १ | **जिल्हा परिषद निधी अंतर्गत जनसुविधांसाठी विशेष अनुदानाने (२५१५, १३८१) सन २०२१/२२ अंतर्गत वाकडी ग्रामपंचायत हद्दीत मोर्बे रोड ते हरिश्चंद्र पाटील यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे** | ४०००००/- | ४०००/- | जि.प. मार्फत जनसुविधा अंतर्गत (D.P.A.C) अनुदान २०२१-२२ |

**अटी व शर्ती**

१) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत वाकडी यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
२) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
३) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.
४) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
५) निविदा किंमत ना परतावा राहील.
६) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
७) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २.३३% आयकर, १% कर्मचारी विमा, ०.१५% सर चार्ज रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
८) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
९) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१०) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
११) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
१२) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत वाकडी**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत वाकडी**
**ता.पनवेल, जि.रायगड**


# ब्राह्मण सभेचा वर्धापनदिन संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेचा वर्धापनदिन सोहळा पनवेल येथील फडके नाट्यगृहामधे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यानिमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. गेली दोन वर्षे कोरोनामुळे आलेले निर्बंध मुक्त झाल्याने या मेळाव्याला ज्ञातीबांधवांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

प्रारंभी दीपप्रज्वलन झाल्यानंतर अध्यक्ष दीपाली जोशी यानी उपस्थिताना संबोधित केले. नंतर ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार आणि राज्यनाट्य परिक्षण समिती सदस्य शामनाथ पुंडे, भरतनाट्यम विशारद सई जोशी, राज्य नाट्यपुरस्कार विजेती पल्लवी देशपांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. नंतर सभासद कलाकारानी गणेशवंदना, लेझीम, नृत्य, गायन आदी कलाप्रकारांचे सादरीकरण केले. त्यानंतर मोहन हिन्दुपूर दिग्दर्शित तिमिरातुनी तेजाकडे हा संगीतप्रधान नाट्याविष्कार संपन्न झाला. अथर्व देव यानी ऑर्गन आणि अमोल खासनिस यानी तबलासाथ केली. तर प्रकाशयोजना मिलिन्द मोघे यांची होती.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## कर्जत उपविभाग महसूल कर्मचारी आज पासून बेमुदत संपावर

व मंडळ अधिकारी यांची सेवा ज्येष्ठता याद्या राज्य स्तरावर एकत्रित करण्याबाबत पत्र काढलेले आहे; परंतु अव्वल कारकून व मंडळ अधिकारी हा जिल्हास्तरीय संवर्ग असल्यामुळे त्यांच्या याद्या या राज्यस्तरावर एकत्रित करण्याची प्रक्रिया ही अन्यायकारक असल्याने पत्र तात्काळ रद्द करावे, अशीही संघटनेची मागणी आहे. इतर मागण्यांबाबत सरकारकडे वारंवार पाठपुरावा करूनही फक्त आश्वासन मिळत असून त्यांची पूर्तता होत नसल्याने संपात कर्जत उपविभागातील कोतवाल - १७, शिपाई- २, महसूल सहायक - १४,अव्वल कारकून - ०९, नायब तहसीलदार (पदोन्नत)- ०३,पुरवठा निरीक्षक - ०१,मंडळ अधिकारी - ०३ असे एकूण -४९ महसूल कर्मचारी सहभागी झाले आहेत.

## मंत्रिमंडळात होणार फेरबदल?; महाविकास आघाडीच्या हालचालींना वेग

काहींचे म्हणणं आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्षपद शिवसेनेकडे घेऊन त्याबदल्यात एखादं मंत्रिपद काँग्रेसला देता येईल का यावरही बैठकीत चाचपणी केली जाईल. अलीकडेच गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या कारभारावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे नाराज असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. परंतु त्यानंतर मुख्यमंत्री कार्यालयाकडून हे वृत्त फेटाळून लावले. मात्र गृह खाते मुख्यमंत्र्यांनी घ्यावं अशी मागणी शिवसेना नेते करत आहेत. त्यातच निधी वाटपावरूनही महाविकास आघाडीच्या आमदारांमध्ये नाराजी आहे. शिवसेना, काँग्रेस या दोन्ही पक्षाच्या आमदारांना निधी वाटप करताना दुजाभाव होत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे मध्यंतरी २५ आमदार नाराज असून ते अर्थसंकल्पीय अधिवेशनावर बहिष्कार टाकण्याच्या तयारीत होते. त्यामुळे या सर्व विसंवादाच्या मुद्द्यावर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांमध्ये चर्चा होण्याची शक्यता आहे.

## मालमत्ता कर भरावा : आयुक्त गणेश देशमुख

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ५१ अन्वये शास्ती फी किंवा वसूलीचा खर्च माफ करण्याबाबत आयुक्तांस आपल्या स्वेच्छनिर्णयानुसार आधिकार प्राप्त आहे. या कायद्यानूसार आयुक्तांनी शास्ती मध्ये सवलत देण्याचा आदेश जाहीर केला आहे. सन्मानीय सर्वांचा विचार करुन महापालिकेने १ एप्रिल २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत मालमत्ता कर भरणाऱ्यांसाठी १०० टक्क्यांपासून ते २५ टक्क्यांपर्यंतची सवलत देऊ केली आहे. ०१/०१/२०२३ पासून १००% शास्ती फी आकारण्यात येईल. एक रकमी कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांनाच या कर सवलतीचा लाभ मिळणार आहे. मालमत्ताधारकांनी विहीत वेळेमध्ये आपला मालमत्ता कर भरून या सवलतीचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# ३५वे स्नेहसंमेलन आनंदात साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

द सेंट्रल रेल्वे तिकिट चेकिंग स्टाफ वेलफेअर ट्रस्ट मुंबई चे ३५वे वार्षिक स्नेहसंमेलन सी एस टी एम ऑडिटोरिम मध्ये मोठ्या आनंदात जल्लोषात कोविड बाबत नियमांचे पालन करत साजरा झाले.

सदर कार्यकारी रेल्वेचे मान्यवर रेल्वे अधिकारी गौरव झा, प्रकाश कानोजिया, डगलस मिनेझिस, व्ही एस मीणा, आर बी दीक्षित, दीपक शर्मा यांच्या उपस्थित १५ सेवानिवृत्त स्टाफचा सत्कार करण्यात आला त्या मध्ये ट्रस्टचे ट्रस्टी आर आर चौधरी, तिकिट चेकिंग परिवारचे अध्यक्ष संजय आंग्रे तसेच त्यांच्या पत्नीचा ही सत्कार करण्यात आला. सन २०२१ मधील दहावी/बारावी उत्तीर्ण विध्यार्थांचा गुणगौरव करण्यात आला. विनोद मोहिते. मुरली अय्यर, व महालक्ष्मी अय्यर यांचे मार्गदर्शन व सह कलाकार सोबत. तिकिट चेकिंग स्टाफचा सुरझंकार हा गाण्यांचा कार्यक्रमने सर्वांचे अप्रतिम मनोरंजन केले. ट्रस्टचे अध्यक्ष राणाप्रताप तिवारी, सचिव डी व्ही चिंदरकर, खजिनदार जी बी कदम ,सहा सचिव हरिश मोंडकर,उपाध्यक्ष सुहास जोशी, ट्रस्टी शेखर तांबे, बाला पिल्लाई, लीना गोरडे यांची उत्तम कार्यक्रमाची आखणी नियोजन मुळेच सुंदर कार्यक्रम झाला.


## जाहीर नोटीस

याद्वारे सामान्य जनतेला कळविणेत येते आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णनामध्ये नमूद केलेली मिळकत **१) श्री.सुधीर रामचंद्र तेरेदेसाई** यांच्याकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**

मौजे : वलप, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर १२४, क्षेत्रफळ १-२५-२० हे.आर.पॉ. **पैकी विक्री क्षेत्र ०-१२-००**

**सही/-**
**व्ही.व्ही.खेमका**
**ॲडव्होकेट**
**९/५३, भुपेन चेंबर्स, तिसरा मजला,**
**दलाल स्ट्रीट, मुंबई-४००००२**
**मो.नं.९८२१४८५८५२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, **श्री.चंद्रकांत भिवा पाटील,** रा.घर नं.२९८, नावडे, कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना फाईल नं.६५३, येथील तळोजा नोड, प्लॉट नं.२१ सी प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. तसेच वर नमूद शेतकरी त्यांचा मुलगा व माझे अशिल श्री.प्रमोद चंद्रकांत पाटील रा.नावडे पनवेल यांना खाली वर्णन केलेला भूखंड बक्षिसपत्राने कायमस्वरुपी देत आहेत.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक ६५३ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | १ | २१ सी | २९९.२८ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसा.,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या जमीन मिळकती ह्या मौजे : बंबावी, ता.पनवेल, जि.रायगड येथील असून ह्या जमिनींच्या कब्जेदार सदरी **श्री.संता उर्फ संतोष गोमा मुंडकर व अनंता गोमा मुंडकर वगैरे इतर ३** यांच्या एकत्र कुटुंबाच्या नावाची नोंद आहे. सदरच्या जमीन मिळकतीचा तपशिल येणेप्रमाणे :-

**मौजे : बंबावी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमिनीच्या मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४६ | ३+४/ब | ०-३२-३ | ७.५६ |
| ४६ | ५ | ०-३०-६ | ३.४० |
| ४२ | ३ | ०-०२-०८ | |
| ४३ | १६ | ०-१२-०१ | |
| | पो.ख. | ०-००-०८ | |
| | | ------- | |
| | एकूण | ०-१२-०९ | |

भूसंपादनाच्या ॲवॉर्डप्रमाणे सदरच्या जमीन मिळकती एकत्र कुटुंबाच्या समान सामाईक मालकी हक्काच्या वरील गट नं.४६/३+४ ब व ४६/५ ह्या जमिनींच्या एकूण ० हे ६२ आर ९ पॉ क्षेत्राच्या साडेबारा टक्के योजनेप्रमाणे वाटप करावयाच्या योजनेंतर्गत मुख्य भूमी व भूमापन अधिकारी यांनी त्यांचेकडील वाटपपत्र क्रं.सिडको/भूमी/साटयो/उलवे/२०१९ दि.०१/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये (उलवे फाईल नं.१३२६) अन्वये अनंत गोमा मुंडकर यांच्या नावे उलवे नोड सेक्टर नं.१८ येथील भूखंड क्रं.९ ए क्षेत्र ४५० चौ.मी. वाटप केलेला आहे.

वरील जमीन मिळकती व भूखंड **श्री.संता उर्फ संतोष गोमा मुंडकर व अनंता गोमा मुंडकर वगैरे इतर ३** यांच्या नावे असल्या तरी सदरच्या सर्व जमीन मिळकती ह्या मयत मुळ **कै.जोमा बुध्या मुंडकर** यांच्या मिळकती होत्या व आहेत. सदरच्या मिळकती एकत्र कुटुंबांच्या अविभाज्य हक्क हिश्श्याच्या जमीन मिळकती आहेत ह्या जमीन मिळकतींमध्ये **गणेश नारायण मुंडकर, लक्ष्मण नारायण मुंडकर वगैरे १२** ह्यांचा ही समान सामाईक अविभाज्य हक्क हिस्सा आहे. सबब ह्या जमीन मिळकतीचे संदर्भात वर नमूद भूखंडाबाबत खरेदी विक्रीचा व्यवहार कोणीही अनंत गोमा मुंडकर वगैरे इतर यांचे बरोबर करू नये केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदारावर राहील याची नोंद घ्यावी म्हणून ही जाहीर नोटीस दाखल केली आहे.

पनवेल
दि.०४/०४/२०२२

**सही/-**
**श्री.गणेश नारायण मुंडकर**
**रा.जुई कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९०८२४८५८४८**

सोनावणे साहेब कोर्ट
**अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१५६८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०४/२०२२

**कै.सिद्धार्थ भाग्या मोहिते (मयत) यांचे कायदेशीर वारस**
**श्रीमती.शुभांगी सिद्धार्थ मोहिते**
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.रुम नं.००१, पुष्प कुटीर सोसायटी,
प्लॉट क्र.६७, सेक्टर ४, नवीन पनवेल ४१०२०६
**कु.सुमेधा सिद्धार्थ मोहिते**
वय : २५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.रुम नं.००१, पुष्प कुटीर सोसायटी,
प्लॉट क्र.६७, सेक्टर ४, नवीन पनवेल ४१०२०६
**कु.सौरभ सिद्धार्थ मोहिते**
वय : २१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.रुम नं.००१, पुष्प कुटीर सोसायटी,
प्लॉट क्र.६७, सेक्टर ४, नवीन पनवेल ४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, **कै.सिद्धार्थ भाग्या मोहिते (मयत)** यांचे वारस अर्जदार **श्रीमती.शुभांगी सिद्धार्थ मोहिते** ह्या पत्नी आहेत. **कु.सुमेधा सिद्धार्थ मोहिते** ही मुलगी आणि **कु.सौरभ सिद्धार्थ मोहिते** हा मुलगा आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. **कै.सिद्धार्थ भाग्या मोहिते** यांचा मृत्यू दि.१३/०३/२०१५ रोजी राहत्या घरी म्हणजेच रा.रुम नं.००१, पुष्प कुटीर सोसायटी, प्लॉट क्र.६७, सेक्टर ४, नवीन पनवेल ४१०२०६ येथे झालेला आहे.

**कै.सिद्धार्थ भाग्या मोहिते यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**
**रा.रुम नं.००१, पुष्प कुटीर सोसायटी, प्लॉट क्र.६७, सेक्टर ४, नवीन पनवेल ४१०२०६. २५२ चौ.फुट २३.४१ चौ.मीटर २१० कारपेट नवीन पनवेल-४१०२०६, जि.रायगड**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळण्याकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्जशिवाय कोणीही या मिळकतीचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्याची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न केल्यास कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदारास वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि. २५ माहे ०३ सन २०२२ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, मौजे : आडिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही **श्रीमती.रशिदा अ.हमीद शेख** व इतर ७ यांच्या सामाईक मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत आहे. सदरहू मिळकत ही **श्रीमती.रशिदा अ.हमीद शेख** व इतर ७ यांचेकडून आमचे अशिल श्री**.उजैफा सुहेल सिद्दीकी** ह्यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आडिवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | गट क्र व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| आडिवली | ११४/३ | ०-१४-४० | २.३१ |

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, समझोता करार, ताबा कब्जा, कुळ हक्क, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस (२१) दिवसाच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे अगर नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

तळोजा
दि.०४/०४/२०२२

**सही/-**
**ॲड.सलमान रशिद पटेल**
**मु.पो.तळोजा-पाचनंद, न्यू भारत**
**राईस मिल जवळ, ता.पनवेल,**
**जि.रायगड-४१०२०८**
**मो.नं.९२२२२२२७१६**

मा.मुजावर साहेब कोर्ट
**ॲड.प्रमिला मो. ठाकूर**

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश सो., यांच्या कोर्टा समोर
सी.एम.ऐ.नं.१४२३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०६/२०२२

**सौ.चांदनी जगदिपसिंग ठाकूर वगैरे** अर्जदार
विरुद्ध
**मनोज अमरचंद पाटील** सा.वाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ **सौ.चांदनी जगदिपसिंग ठाकूर** अर्जदार नं.२ **सौ.विद्या दत्तात्रेय थळे** अर्जदार नं.३ **पुजा कुमार फणसेकर** व सा.वाला **मनोज अमरचंद पाटील** यांचे वडील **कै.अमरचंद हासू पाटील** हे दि.१९/०७/२०१८ रोजी मयत झाले असून आई **कै.प्रमोदिनी अमरचंद पाटील** या दि.०६/०८/२०२० रोजी पनवेल येथे मयत झाले आाहेत. त्यांचा दाखल अर्जासोबत जोडला आहे. तसेच मयत **कै.अमरचंद हासू पाटील** व **कै.प्रमोदिनी अमरचंद पाटील** यांचा मुलगा **कै.संजय अमरचंद पाटील** हे दि.२०/०५/२०१४ रोजी पनवेल येथे मयत झालेले आहे. त्यांना अर्जदार क्र.४ पत्नी **गितांजली संजय पाटील** अर्जदार क्र.५ मुलगी-**कु.शाल्मली संजय पाटील** व मुलगा **कु.ईश्वरी संजय पाटील** हे कायदेशीर वारस आहेत.

**कै.अमरचंद हासू पाटील** हे दि.१९/०७/२०१८ रोजी मयत झाले असून आई **कै.प्रमोदिनी अमरचंद पाटील** या दि.०६/०८/२०२० रोजी पनवेल येथ मयत झाले आहेत. यांच्या मृत्यूनंतर यांच्या नावाने खालील मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन : ब्लॉक नं.बी/१९, तळमजला,**
**श्री गणेश कृपा को. हौसिंग सोसायटी, पनवेल, रायगड**

सदरील वारस दाखला मधील मिळकती संदर्भात अन्य कोणाच्या नावाने मृत्यूपत्रानं, खरेदीखताने, हक्कसोडपत्राने, बक्षिसपत्राने, गहाण अथवा इतर कोणत्याही वारसांची कसलीही हरकत असल्यास सदरील जाहिरानामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत मे.पनवेल कोर्टात हरकत नोंदवावी.

वरील मुदतीमध्ये ३० दिवसात हरकत आली नाही तर सदरील मिळकतींना अर्जदार **राजेश शामसुंदर कोरगांवकर व शीतल विनायक गुजर हे कै.शामसुंदर दत्ताराम कोरगांवकर, आई कै.जयमाला शामसुंदर कोरगांवकर** यांच्या निधनानंतर कायदेशीर वारस आहेत असे वारस दाखला त्यांना देण्यात येईल. तसेच मागाहून येणाऱ्या हरकतींचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०४/०४/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बुधवारी विचुंबेत ५९ वी महाराष्ट्र श्री २०२२ राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन, बॉडी बिल्डर्स अँण्ड फिटनेस असोसिएशन रायगड, इंडियन बॉडी बिल्डर्स अँण्ड फिटनेस फेडरेशन आणि भारतीय जनता पार्टी विचुंबे यांच्या वतीने बुधवार दिनांक ०६ एप्रिल रोजी सायंकाळी ०५ वाजता ५९ वी महाराष्ट्र श्री २०२२ राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

विचुंबे गाव येथे हि स्पर्धा होणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अंडर प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेश लांडगे, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृहनेते परेश ठाकूर, छत्रपती पुरस्कार विजेते संजय मोरे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी ८ वी वुमेन फिजिक, ५ वी मेन फिजिक आणि दुसरी क्लासिक बॉडी बिल्डिंग स्पर्धा पार पडणार आहे. या स्पर्धेचा लाभ क्रीडा रसिकांनी घ्यावा, असे आवाहन विचुंबे ग्रामपंचायत उपसरपंच प्रमोद भिंगारकर, असोसिएशनचे आयोजक सचिव दिनेश शेळके, रायगड कार्याध्यक्ष मारुती आडकर यांनी केले आहे.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# शेतकऱ्यांच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीकोनातून कृषी विभाग कार्य करणार : ना.दादाजी भुसे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शेतकऱ्यांची प्रतिष्ठा वाढली पाहिजे, शेतकऱ्यांची सर्वांगीण प्रगती झाली पाहिजे, आपला शेतकरी चिंतामुक्त झाला पाहिजे, हे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे व्हिजन आहे, त्या दृष्टीकोनातून कृषी विभाग कार्य करणार असल्याचे प्रतिपादन कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी आज कर्जत–नेरळ येथे केले.



कृषी विभागाचे विविध उपक्रम व नियोजन दिशा याकरिता कृषी मंत्री श्री.दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली नेरळ येथील सगुणा बाग येथे आज बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी कर्जत–खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आणि कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, तहसिलदार विक्रम देशमुख, नेरळ पोलिस निरीक्षक विजय तेंडूलकर तसेच जिल्हा व तालुका कृषी अधिकारी हे उपस्थित होते.

या बैठकीत महाराष्ट्रात खरीप हंगामासाठी कृषी विभागाकडून केली जाणारी पूर्वतयारी याबाबत काही निर्णय घेण्यात आले तसेच खरीप हंगामासाठी लागणारी खते व बियाणे पुरेशा प्रमाणात आहेत का? शिवाय शेतकरी बांधवांनी कमी लागवड खर्चात जास्तीत जास्त दर्जेदार शेतमालाची निर्मिती कशी करता येईल व शेतकऱ्यांच्या शेतावर बियाणे उपलब्ध कसे करता येवू शकते, यानुषंगाने कृषी विभागाकडून आढावा बैठकीदरम्यान घेण्यात आला. शेतीसंबंधीच्या आधुनिक तंत्रज्ञानावरदेखील चर्चा करीत शेतकऱ्याच्या पिकाबाबत समस्या सोडविण्यासाठीदेखील या बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. यावेळी कृषी विभाग अधिकारी यांनी देखील आपली मते मांडली.

प्रगतशील व नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी ओळखले जाणारे शेतकरी कृषीभूषण श्री.शेखर भडसावळे यांच्या सगुणा बागेस भेट देत कृषीमंत्री दादाजी भुसे यांनी तेथील नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी केली आणि श्री.भडसावळे यांचे त्यांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांबाबत त्यांचे कौतुक केले. या भेटीदरम्यान श्री.शेखर भडसावळे यांनी शेतात लागवड केलेल्या पिकांची व त्याला आवश्यक असणारी जमीन, ड्ढ या पद्धतीच्या वापरातून येथील शेतातच तयार करण्यात आलेल्या नैसर्गिक व रासायनिक खताबाबत, पिकविलेल्या पालेभाज्या व कडधान्ये, पिकांच्या गुणवत्तेबाबतची माहिती यावेळी कृषी मंत्री श्री.भुसे यांना दिली.

## विमा काढण्याच्या नावाखाली २६ लाख ८० हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विमा काढण्याच्या नावाखाली ३७ वर्षीय इसमाची २६ लाख ८० हजार ७१८ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार पनवेलमध्ये उघडकीस आला आहे त्या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल, लोखंडीपाडा येथील नील पार्क सोसायटीत राहणारे सुरेश शिवराम दवे यांना मोबाईलवर एका महिलेचा फोन आला. एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स मधून बानी सिंग बोलत असून हेल्थ पॉलिसीची ऑफर असल्याचे तिने सांगितले. सुरुवातीला दवे यांनी नकार दिला. मात्र वारंवार पॉलिसीसाठी महिला फोन करत होती. त्यानंतर दोन पॉलिसी घेण्यास त्यांनी होकार दिला. पॉलिसी चा फॉर्म भरून भरून घेण्यासाठी व पोलिसी साठी लागणाऱ्या चेक घेण्यासाठी बानी सिंगने एक माणूस यांच्या घरी पाठवला. त्यांनी ९९ हजार ९९९ रुपयांचे दोन चेक एचडीएफसी लाइफच्या नावाने दिले. चेक वाटल्यानंतर बानी सिंगने फोन करून व्हेरिफिकेशन करण्यासाठी सांगितले. यावेळी राहण्याचा पत्ता, आधार कार्ड, बँक डिटेल घेण्यात आले. व पॉलिसीच्या फाईलवर कंपनीने सात लाख ८५ हजार ६९० रुपयांचा बोनस जमा केला असून ती रक्कम तुमच्या अकाउंटवर जमा करायचे असेल तर २५ टक्के रक्कम त्यांच्याकडे जमा करावे लागेल असे फोनवर सांगण्यात आले.

यावेळी एक लाख ९६ हजार चारशे २२ रुपये आरटीजीएसने पाठवण्यात आले. त्यानंतर बानी सिंग, एपी शुक्ला आणि ईतर अनोळखी व्यक्तींनी पॉलिसीच्या वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या अकाउंटवर २६ लाख ८० हजार ७१८ रुपये पाठवण्यास सांगितले. ती रक्कम दवे यांनी पाठवली. जमा केलेली रक्कम व एचडीएफसी लाइफ कंपनीतर्फे बोनस व इतर बेनिफिटची रक्कम मिळून ६८ लाख ५५ हजार एवढी रक्कम तुमच्या अकाउंटवर जमा होईल व दोन पॉलिसी पाठवण्यात येतील असे दवे यांना सांगण्यात आले.

मात्र त्यानंतर बानी सिंग व इतर लोकांचे फोन बंद लागत होते. दवे यांनी एचडीएफसीच्या कस्टमर केअरला फोन करून माहिती घेतली असता अशी कोणतीही पॉलिसी एचडीएफसी करून काढण्यात आलेली नव्हती. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच दवे यांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# उरण–पिरवाडी बीचवर पर्यटनाला बहर

**दै.रायगड नगरी । उरण**

मुंबई ,ठाणे, नवी मुंबई येथील असंख्य तरुणाईचे मौजमजा करण्याचे पिकनिक स्पॉट म्हणजे उरण येथील पीरवाडी बीच होय.सरंक्षक बंधाऱ्यांच्या उभारणी नंतर या बीचची लया पुन्हा बहरते आहे. यामुळे बीचवर कोरोनानंतर सणासुदीच्या आणि सुट्टीच्या दिवसात पर्यटनही आता बऱ्यापैकी बहरत चालले आहे.

उरणच्या पिरवाडी समुद्रकिनारा हा पर्यटकांना नेहमीच आकर्षित करीत आला आहे. किनाऱ्यावर अथांग पसरलेली रुपेरी वाळू आणि या रुपेरी वाळूत पायी चालण्याची मजा काही औरच असते. निसर्गरम्य वातावरण , चौफेर अथांग पसरलेला समुद्र ,समुद्र किनाऱ्यावरील लांबचलांब नजरेत पडणारी नारळी, पोफळी आणि सुरुची झाडे या नयनरम्य वातावरणामुळे पीरवाडी पर्यटन बीच म्हणून नावारूपाला आले आहे.

मुंबई पासून अगदी जवळच पिरवाडी बीच असल्याने दरवर्षी येथे येणार्या पर्यटकांची संख्या वाढत आहे. यामध्ये मुंबई, नवीमुंबई, ठाणे, पनवेल आणि इतर भागातुन येणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक असते.येथील समुद्र किनाऱ्यावर असलेल्या दर्ग्यावर मुस्लिम समाजातील नव्हे तर हिंदू धर्मातील भाविकांची नेहमीच गर्दी असते. मध्यंतरीच्या काळात उरण–पिरवाडी किनार्याची मोठ्या प्रमाणात धुप होत चालली होती.

त्यामुळे समुद्राच्या भरतीच्या अजस्त्र लाटांनी सरंक्षक बांधबंदिस्ती उध्वस्त करून समद्राचे पाणी सागरी सीमा ओलांडून समुद्र रेषेपासुन दहा ते पंधरा मीटर अंतरापर्यंत शिरायचे.धुप प्रतिबंधक नसल्याने या किनार्याची प्रचंड धूप होऊन प्रचंड प्रमाणात नासधूस झाली होती.समुद्र किनाऱ्यावरील लांबचलांब नजरेत पडणारी नारळी, पोफळी आणि सुरुची झाडे उन्मळून पडली होती.झाडांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली होती.किनार्यावर असलेल्या स्मशानभूमीदेखील लाटांच्या तडाख्याने पार उद्ध्वस्त झाली होती.याकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्याने उरणमधील पर्यटन म्हणून ओळखले जाणारे पीरवाडी बीच नष्ट होण्याच्या मार्गाला लागले होते.

आता मात्र ओएनजीसी आणि बंदर विभागाच्या माध्यमातून पीरवाडी बीचची धुप थांबविण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून मजबूत अशी सरंक्षक तटबंदी उभारली जात आहे.भलेमोठे दगड तटबंदी साठी वापरण्यात येत आहेत.यामुळे किनाऱ्याची मोठ्या प्रमाणावर होणारी धुप थांबण्यास मदत झाली आहे.किनाऱ्यावरील नारळी पोफळीच्या आणि इतर झाडांनाही तटबंदी मुळे आपोआप सरंक्षण मिळाले आहे. त्यामुळे पीरवाडी बीच परिसरात निसर्गरम्य वातावरण निर्माण होण्यास मदत झाली आहे.

मागील काही वर्षांत किनाऱ्याची बिघडलेली लया आणि मागील दोन वर्षांच्या कोरोना काळात पीरवाडी बीच–वरील पर्यटकांची संख्या रोडावली होती. आता मात्र सरंक्षक तटबंदी नयनरम्य वातावरणामुळे बीचवर पर्यटनही बहरुन लागले आहे.समुद्राचा आनंद लुटण्यासाठी मोटर स्पीडबोटीची व्यवस्था आहे.त्यामुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबई व परिसरातील शेकडो हौशी पर्यटक या ठिकाणी सणासुदीच्या आणि सुट्टीच्या काळात येत आहेत.पर्यटनाचा आनंद घेत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी या जमिनीचे मालक **प्रभाकर बाबुराव म्हात्रे, संतोष बाबुराव म्हात्रे, अनिल बाबुराव म्हात्रे, मालती हरिश्चंद्र म्हात्रे, विशाल हरिश्चंद्र म्हात्रे, श्रद्धा संजय पाटील, शितल हरिश्चंद्र म्हात्रे, आनंदी सुनील म्हात्रे व सुरज सुनील म्हात्रे** सर्व रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार |
|---|---|---|---|
| १७७ | १/अ/१ | ०–२९–००<br>पो.ख.०–०२–००<br>एकूण ०–३१–०० | ४.१३ |

वरील वर्णनाची शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र पोटगी, ताबा, कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी रस्ता, पाणी येण्या–जाण्याचा रस्ता अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास किंवा तयाच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यासंबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी कागदपत्रांच्या स्वरुपात स्वतःहून हजर होवून आमचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कळवावे. वरील मुदतीत कोणीही कसलीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही असे समजण्यात येईल किंवा असल्यास तो हक्क व हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.०५/०४/२०२२
स्थळ : उरण

**सही/–**
**अॅड.योगेश नामदेव म्हात्रे**
**रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९८१९९१०८०८/८०९७१०८०६०**

---

मा.श्री.सोनावणे सो।

**अर्जदारातर्फे वकील**
**अॅड.चांदोरकर उमेश**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.४३८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०५/२०२२

**१) श्री.प्रकाश दत्तात्रेय गोडबोले**
वय : ६२ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.रजनीगंधा अपार्टमेंट, फ्लॅट नं.२०३, दुसरा मजला,
लोकमान्य मल्टीपरपझ, सोसायटीजवळ, पनवेल–४१०२०६
**२) श्री.राजेंद्र दत्तात्रेय गोडबोले**
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : वकीली
रा.वसंतअर्पित–२, फ्लॅट नं.४०१, ४०२, दास मारुती
मंदिरासमोर, टिळक रोड, पनवेल–४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ हे **कै.निला दत्तात्रेय गोडबोले** आणि **कै. दत्तात्रेय शंकर गोडबोले** यांची मुले आहेत. **कै.निला दत्तात्रेय गोडबोले** यांचे दि.२२/०४/२०१२ रोजी आणि **श्री.दत्तात्रेय शंकर गोडबोले** हे दि.१४/१२/२०१५ रोजी मुक्काम पनवेल येथे मयत झाले असून, ते मु.पनवेल, जि.रायगड येथील रहिवासी होते. कायद्यातील तरतुदीनुसार **कै. निला दत्तात्रेय गोडबोले** आणि **कै.दत्तात्रेय शंकर गोडबोले** यांचे अर्जदार क्र.१ व २ हेच कायदेशीर वारस आहेत.

**कै.निला दत्तात्रेय गोडबोले** आणि **कै.दत्तात्रेय शंकर गोडबोले** यांच्या मालकीची जंगम मिळकत म्हणजे अनुक्रमे आरबीएल बँक (पुर्वीची रत्नाकर बँक लि.), बँक ऑफ महाराष्ट्र, सिंडीकेट बँक, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया या बँकातील बचत खात्यातील रक्कमा, तसेच अनुक्रमे आरबीएल बँक (पुर्वीची रत्नाकर बँक लि.), बँक ऑफ बडोदा, भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, आय.डी.बी.आय.बँक या बँकेमधील मुदत ठेवी या जंगम मिळकतीबाबत **कै.निला दत्तात्रेय गोडबोले** आणि **कै.दत्तात्रेय शंकर गोडबोले** यांचे कायदेशीर वारस असल्याचे सक्सेशन सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदरच्या सक्सेशन सर्टीफिकेटचे कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास, सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी हरकत स्वतः अथवा वकीलांमार्फत सादर कराव्यात. सदर नोटीशीच्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास ह्या अर्जदारांचे लाभांत वारस दाखला (सक्सेशन सर्टीफिकेट) दिले जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.०४/०४/२०२२ रोजी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर सो।

**अर्जदारांतर्फे वकील : अॅड.प्रशांत भुजबळ**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४/२०२२
नि.नं.१४
ने.ता.०४/०५/२०२२

**१) श्रीमती.रंजना कैलास तांडेल**
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
**२) कु.पुजा कैलास तांडेल**
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
**३) कु.ज्योती कैलास उर्फ कैलाश तांडेल**
वय : १० वर्षे, धंदा : शिक्षण
नं.२ व ३ तर्फे अज्ञान पालनकर्ती
आई अर्जदार नं.१
**४) श्रीमती.तुळशी मोरेश्वर तांडेल**
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.घर नं.१४३, बुद्धवाडी, करंजाडे,
पो.वडघर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, **कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल** यांचे निधन दि.२५/१२/२०२० रोजी झालेले आहे. **श्रीमती.रंजना कैलास तांडेल वगैरे** ह्यांनी **कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल** यांच्या सामाईक मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतींचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

| गावाचे नाव | यु.केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| पारगांव डुंगी | १३२ | ३४ | १२ | ०–०४–६ |
| | | ३४ | २० | ०–०६–९ |
| | | ३५ | ३ | ०–२४–५ |
| पारगांव | ९० | २५ | ४ | ०–३७–० |
| | | २६ | १ | ०–३७–० |
| | | २७ | २ | ०–७३–८ |

वरील संपादीत मिळकतीपोटी २२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून **कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल** यांना सामाईकात **मौजे : ''पुष्पकनगर'' दापोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.१५, सेक्टर नं.६, क्षेत्र २९०० चौ.मी.** हा भूखंड दि.०३/०६/२०१५ रोजीच्या वाटप पत्राद्वारे वितरित करण्यात आलेला आहे.

**श्रीमती.रंजना कैलास तांडेल वगैरे** हे **कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल** यांचे कायदेशीर वारस आहेत, ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट **श्रीमती. रंजना कैलास तांडेल** वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर **कै.कैलाश उर्फ कैलास मोरेश्वर तांडेल** यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०४/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

**अर्जदारांतर्फे वकील**
**धनश्री मा. पाटील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४२०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०५/२०२२

**१) श्री.मारुती लहू पाटील**
वय : ७४ वर्षे, व्यवसाय : शेती
**२) जमन लहू पाटील (मयत) चे वारस**
**२/१) श्रीमती.ताराबाई जमन पाटील**
वय : ६४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
**२/२) श्री.मिन्नाथ जमन पाटील**
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : शेती
**२/३) श्री.हनुमान जमन पाटील**
वय : ४० वर्षे, व्यवसाय : नोकरी
**२/४) श्री.रामचंद्र जमन पाटील**
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
**२/५) श्री.लक्ष्मण जमन पाटील**
वयः ३४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
**२/६) श्री.रोहित जमन पाटील**
वय : २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
**२/७) सौ.वर्षा मंगेश म्हात्रे**
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.३४५/०१, मराठी शाळेजवळ,
इनामपुरी, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
**३) श्री.बळीराम लहू पाटील**
वय : ५६ वर्षे, व्यवसाय : शेती
१ ते २/६ व ३ सर्व रा.मौजे : वलवली,
ता.पनवेल, जि.रायगड
**४) श्रीमती.चंद्रभागा महादेव पाटील**
वय : वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मौजे : रोहिंजण, दुर्गा माता मंदिराजवळ,
तळोजा ए.वी., ता.पनवेल, जि.रायगड
**५) सौ.रेखा बाळाराम उलवेकर**
वय वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मौजे : खिडुकपाडा, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी **लहु तुकाराम पाटील** हे दि.१६/०९/१९९४ रोजी मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत **लहू तुकाराम पाटील** यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकत आहे.

**परिशिष्ट 'अ'**
**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आंबेतखार, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्वे क्र. | हि.क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | AMB-२०२ | ४३८ | २५१ | ०–१६.२ | २.१९ |

**परिशिष्ट 'ब'**
**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वलवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्वे क्र. | हि.क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १४७ | १२८ | ० | ०–११.० | ०.३७ |

सदर मिळकत अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी **कै.लहू तुकाराम पाटील** यांचे वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी सदरचा अर्ज या ना.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०१ माहे एप्रिल सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

**अर्जदारांतर्फे वकील**
**अॅड.आर.एल.राऊत**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७०३/२०२१
नि.नं.१३/ड
ने.ता.०६/०५/२०२२

**१) श्रीमती.वनिता विक्रम पोळ**
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
**२) श्री.अमोल विक्रम पोळ**
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
**३) श्री.आशिष विक्रम पोळ**
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
**४) श्री.आदित्य विक्रम पोळ**
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
१ ते ४ सर्व रा.बी.३६, रुम नं.१२, सेक्टर ११,
केंद्रीय विहार (३) को.ऑप.हौ.सो.लि., खारघर,
नवी मुंबई, रायगड, महाराष्ट्र–४१०२१० अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी **विक्रम शंकर पोळ** हे दि.०८/०५/२०२१ रोजी मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत विक्रम शंकर पोळ यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकती आहेत.

**SCHEDULE OF PROPERTIES**
**SCHEDULE OF PROPERTY "A & B"**

| Sr. No. | Particulars of Property |
|---|---|
| 1 | Flat owned by Late Vikram Shankar Pol, Flat bearing No.G-01, on the Ground Floor, Wing-B in building "Maple" of project "Adhiraj Gardens", Plot No.32, Sector-5, Kharghar, Navi Mumbai, Taluka-Panvel, District-Raigad, valued at Rs.6,08,400/- (Rupees Six Lakhs Eight Thousand Four Hundred Only). |
| 2 | Flat bearing No.Room/Flat No.12, adm. Area B.U.A.- 81.59 Sqm., C.A.-57.36 Sqm., Block No.36, Sector-11, Kendriya Vihar (3) Co-op. Hsg. Soc. Ltd., Kharghar, Navi Mumbai-410210, valued at Rs.8,23,907/- (Rupees Eight Lacs Twenty Three Thousand Nine Hundred and Seven Only). |

**SCHEDULE OF PROPERTY "C"**

The amount lying and pending at in SBI bearing Account No.00000051029594037, CIF No.78129610412, MICR Code-400002194, IFS Code-SBIN0011711, Account Description as "WEALTH S B STAFF" at Pant-nagar, Ghatkopar Branch, remaining balance Rupees Rs.7,03,216.59/- along with interest till today.

**SCHEDULE OF PROPERTY "D & E"**

| Sr. No. | Register No & Date | Registered Owner's Name | Class of Vehicle | Chassis No. | Engine No. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MH46AK8891 10/11/2014 | VIKRAM S. POL | MCYL MOTOR CYCLE | ME4JF392J E7216951 | JF39E70 216980 |
| 2 | MH06AN3049 11/11/2007 | VIKRAM S. POL | MOTOR CAR-NT | MA3EMD81 S00167287 | F10DN3 293544 |

सदर मिळकत अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी **कै.विक्रम शंकर पोळ** यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता त्याने मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०४ माहे एप्रिल सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## २३ लाख ७९ हजार रुपयांची वीज चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनधिकृतपणे वीज पुरवठा घेऊन ८२ महिन्यांपासून वीज चोरी केल्याप्रकरणी महावितरणचे तेवीस लाख ७९ हजार रुपयांचे नुकसान झाले. शेवन परशुराम पाटील यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. महावितरणच्या भरारी पथकाने वळवली येथील शेवन परशुराम पाटील यांच्या घराची पाहणी केली. यावेळी त्यांचे विजेचे मीटर तपासले असता मीटरचे सील तोडलेले दिसून आले. अनधिकृतपणे वीज पुरवठा करून २३ लाख ७९ हजार वीस रुपयांची चोरी केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## नवीमुंबईकरांसाठी पोस्टाची २४ तास सेवा

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

नवी मुंबई विभागातील नागरिकांच्या सुविधेसाठी नवी मुंबई डाक विभागामार्फत २४ तास स्पीड पोस्ट/रजिस्टर्ड पोस्ट बुकिंग सुविधा दि.१ एप्रिल २०२२ पासून वाशी डाक व्यवसाय केंद्र, वाशी मुख्य डाकघर, सेक्टर-१६अ, अग्निशक केंद्राच्या मागे, वाशी, नवी मुंबई येथे सुरु करण्यात आली आहे. स्पीड पोस्ट/रजिस्टर्ड पोस्ट सुविधा सर्वांसाठी आणि आठवड्यातील सर्व दिवस २४ तास उपलब्ध आहे. या सुविधेचे उद्घाटन नवी मुंबई क्षेत्र, पनवेल पोस्टल सर्विसेस विभागाच्या डायरेक्टर शरण्या यु. यांच्या हस्ते करण्यात आले. नवी मुंबई परिसरातील नागरिकांनी दिवसा किंवा रात्री त्यांच्या सोयीच्या वेळी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधीक्षक, डाकघर नवी मुंबई विभाग, वाशी यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

## अंध मुलीला लॅपटॉप भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्नेहकुंज आधारगृह, नेरे येथे अंध मुलगी निवेदिता प्रमोद कुडवळकर या मुलीला लॅपटॉप भेट देण्यात आला.

नेरे येथील नितिन जोशी यांची या मुलीची कामोठे येथे एका कार्यक्रमात भेट झाली. हि मुलगी अंध आहे हे त्याना माहीत नव्हते. तीचं सुंदर असे गाणे ऐकत असताना तीला बक्षीस देण्यात आले. त्यावेळेस तेथील निवेदकाने सांगितले कि ती अंध मुलगी आहे. यावेली जोशी हे तीच्या पालकांना भेटलो व काही मदत लागल्यास सांगा यावेली त्यानी सांगितले कि तीला लॅपटॉपची गरज आहे. ती आवाज ऐकून अभ्यास करेल असे तीच्या पालकांनी सांगीतले. हि गोष्ट जोशी यानी त्यांच्या मित्राना सांगितली, ते लगेच तयार झाले. ३ एप्रिल रोजी या मुलीला लॅपटॉप भेट देण्यात आला. लायन्स क्लब ऑफ न्यू पनवेल स्टिल टाऊन आणि स्नेहकुंज आधार गृह नेरे यांच्या वतीने तीला लॅपटॉप भेट देण्यात आला.

# अनैतिक संबधातून त्रासदायक ठरणाऱ्या चुलत आत्याचा आरोपी भाच्याने काढला काटा

**दै.रायगड नगरी । नागोठणे**



स्वतःच्याच चुलत आत्याशी असलेले अनैतिक संबध व त्यातून आत्याकडून वारंवार होणारी पैशांची मागणी यातून त्रस्त झालेल्या भाच्याने आत्याच्या त्रासातून आपली सुटका करून घेण्यासाठी आत्याचा खून करून काटा काढल्याची हादरवून टाकणारी घटना नागोठण्याजवळील रिलायन्स निवासी संकुला समोरील डोंगराळ भागातील जंगलात रविवारी(दि.३) दुपारी घडली. घटनास्थळाच्या जवळच एका बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे शिहू गावातील जयेश घासे व चेतन गदमले यांच्या जागरूकतेमुळे व समयसुचकतेमुळे तसेच पो-लीस नाईक गंगाराम डूमना यांच्या सहकार्याने नागोठणे पोलिसांनी आरोपीला तीन तासांत केले जेरबंद केले. दरम्यान मृत महिला व आरोपी हे नागोठण्याजवळीलच उनाठवाडीतील असून मान-वतेला कालिमा फासणाऱ्या या घटनेमुळे नागोठणे परिसरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या गुन्ह्याची माहिती मिळताच अतिरिक्त पो-लीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी सोमवारी सकाळी घटनास्थळी भेट देऊन गुन्ह्याची माहिती घेतली. यावेळी श्रीवर्धनचे पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी व नागोठण्याचे पोलीस निरीक्षक तांजी नारनवर हेसुद्धा त्यांच्या सोबत होते. त्यानंतर अतुल झेंडे यांनी नागोठणे पोलीस ठाण्यात प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून या गुन्ह्याची सविस्तर माहिती दिली. ३२ वर्षीय मृत महिलेचा पहिल्या लग्नानंतर घटस्फोट झाला होता. त्यानंतर तिने दुसरे लग्नही केले होते. सध्या ती पेण येथील एका दवाखान्यात परिचारिका म्हणून नोकरीला होती. या गुन्ह्यातील २२ वर्षीय आरोपी हा या महिलेच्या चुलत भावाचा मुलगा आहे. या दोघांचे गेली २-३ वर्षांपासून अनैतिक संबध होते. आर-ोपी हा एका खासगी कंपनीत केवळ रोजंदारीवर कामाला होता. असे असूनही अनैतिक संबधामुळे वारंवार होणाऱ्या पैशांच्या मागणीमुळे यापूर्वीही या दोघांच्यात वाद होऊन मृत महिलेने आर-ोपीवर दवाखान्यातील शास्त्राने वार केल्याचा राग आरोपीच्या मनात होता. याच पार्श्वभूमीवर तिला संपविण्याचा कट त्याने रचला होता. रविवारी दुप-ारी तीन वाजण्याच्या सुमारास रिलायन्स निवासी संकुलाच्या प्रवेशद्वारासमोर असलेल्या करकरणी मातेच्या मंदिराकडील डोंगराकडे जाण्यासाठी एक जोडपे मोटारसायकलवरून आल्याचे या दोन्ही सुरक्षा रक्षकांनी पाहिले होते. आरोपीने गाडी उभी केल्यानंतर दोघेही जंगलाकडे जातांना या दोघांत वाद सुरु असल्याचे जयेशला संशय आला व त्याने आपल्या मोबाईल मध्ये गाडीचा फोटो काढला. नंतर सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आरोपी एकटाच खाली आला. त्याने गाडीतील पेट्रोल बाटलीत भरून तो पुन्हा जंगलात गेला. त्यानंतर सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारस पुन्हा खाली आला. याचदरम्यान जंगलातील वरील भागांत धूर येत असल्याचे सुरक्षा रक्षकांच्या लक्षात आल्याने त्यांनी आरोपीस थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यावेळी तो पळून जाण्यास यशस्वी झाला. मात्र नंतर याची माहिती सुरक्षा रक्षकांनी पोलीसांन कळविली. पोलिसांनी गाडीचा फोटो त्यांच्या व्हाट्सअॅप ग्रुपवर टाकला असता पो.ना. गंगाराम डूमना यांनी ही गाडी याआधी नागोठणे पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या एक व्यक्तीच्या मिसिंग तक्रारी मधीलच असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुसारच उपलब्ध माहितीच्या आधारे पोलीस पथकाने आरोपीस त्याच्या घरी जाऊन ताब्यात घेतले. दरम्यान रात्री आठ वाजण्याच्या ही घटना समजली आणि रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास संपूर्ण गुन्ह्याची उकल झाली. घटनास्थळ हा जंगल परिसर असल्याने तपासात अडथळे येऊ शकत होते मात्र दोन्ही सुरक्षा रक्षक जयेश घासे, चेतन गदमले व पो.ना. गंगाराम डूमना यांच्या जागरूकतेमुळे आरोपीला तत्काळ ताब्यात घेण्यास पोलिसांना यश आल्याने त्यांचा पोलीस मुख्यालयातील आढावा बैठकीत सन्मान करण्यात येणार असल्याचे यावेळी अतुल झेंडे यांनी स्पष्ट सांगितले.

## पिण्याच्या पाण्याचा प्रश्नावरून शिवसेना महिला आघाडी आक्रमक

**दै.रायगड नगरी । पनवेल**



सिडको प्रशासन व महाराष्ट्र जलप्राधिकरण मंडळाच्या दुर्लक्षित कामांमुळे नवीन पनवेल शहराला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत असून या संदर्भात शिवसेना महिला आघाडी आज आक्रमक झाली होती व त्यांनी या दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना जाब विचारला.

आज नविन पनवेल महिला शहर संघटक अपूर्वा प्रभू यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र जलप्राधिकरण मंडळ यांच्या कार्यालयात नविन पनवेल शहर प्रमुख यतीन देशमुख, उपशहर संघटिका सुगंधा शिंदे, विभाग संघटिका वैशाली थळी आणि वैशाली घाग, मनीषा शिंदे, सतीश गायकर आणि शहरातील बऱ्याच महिलांनी धडक मारून पाणी प्रश्नासंदर्भात जाब विचारला. पनवेल महानगपालिका क्षेत्रात असलेल्या नविन पनवेल शहाराला भेडसावणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कित्येक वर्ष महिला आघाडी शिवसेनेच्या माध्यमातून सिडको कार्यालय आणि महाराष्ट्र जलप्राधिकरण यांच्यासमोर मांडत आहोत तरीही परिस्थिती जैसे थे. जलप्राधिकरण कार्यकारी अभियंता सूर्यवंशी यांच्याकडून पाण्याचा मुबलक साठा सिडकोला मिळत असूनही सिडको योग्य प्रकारे पाण्याचा पुरवठा प्रत्येक सेक्टरला करू शकत नाही याचे कारण म्हणजे पाणी साठवायला नवीन पनवेल मध्ये पाण्याच्या टाक्याच उपलब्ध नाही. काही वर्षापूर्वी एक टाकी पडली आणि दुसरी पडायच्या स्थितीत आल्यामुळे पाडली गेली पण त्याजागी दुसऱ्या टाक्या अध्याप बांधल्या गेल्या नसल्याने पाण्याचा साठा होऊ शकत नाही आणि सिडको आज नागरिकांना पाण्यासारख्या जीवनावश्यक हक्काला मुकावे लागत असल्याचे अपूर्वा प्रभू यांनी सांगितले. तरी या संदर्भात उपाययोजना करून पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

## टँकर व ट्रेलर एकमेकांवर धडकले ; सुदैवाने जीवितहानी नाही

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

कोलाड पुणे मार्गावर सुतारवाडी कडून कोलाड कडे जाणाऱ्या टँकरने कोलाड कडून सुतारवाडी विळाकडे येणारा ट्रेलर समोरासमोर एकमेकांवर आदलल्याने मोठा आपघात घडला परंतु सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी घडली नाही मात्र काही काळ सदरच्या मार्गावरील वाहतूक ठप्प होती.

या बाबात सविस्तर माहिती अशी सुतारवाडी कडून कोलाड कडे जाणाऱ्या मालवाहू टँकर क्र. एम. एच. ०४ एफ. यू. ३३२१ ने कोलाड कडून विळा भागाड येथे क्वाईल घेवून जाणाऱ्या भरधाव ट्रेलर क्र. एम. एच. ४६ बी. एम. ९९०५ ला जोरदार समोरासमोर धडक दिल्याने टँकर चालकाकडील बाजू पूर्णपणे चेपली असून कोणतीही जीवीत हानी मात्र झाली नाही. हा अपघात सुतारवाडी नजीक ढोकलेवाडी येथील वळणावर घडला आहे. कोलाड ते विळे भागाड पर्यंत अनेक मोठमोठी वळणे आहेत परंतु वाहन चालकांचा वाहनांवर ताबा नसतो. जड अवजड वाहन असो किंवा साधी वाहन असो चालक नेहमी भरधाव वेगाने वाहन हाकत असतात त्यामुळे या मार्गावर नियमितपणे अपघात घडत असतात. सदरच्या मार्गावर आपघात दरम्यान अनेकदा बळी ही गेले आहेत. अनेकवेळा वळणांवर वाहन उलटी सुलटी पलटी मारून दुर्दैवी असे अनेकदा आपघात घडतात यावर मात्र कोणाचे नियंत्रण नाही चालकांचे वेग मर्यादावर नियंत्रण नसल्याने हे वेळोवेळी आपघात घडत असतात असे सर्वत्र बोलले झालेली आहे.

## हिंद मराठा महासंघ कोकण प्रदेश अध्यक्षपदी निवृत्त एसीपी समाज नेते विनोद चव्हाण पदग्रहण सोहळा संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

हिंद मराठा महासंघ हे मराठा समाजाचे मोठे राष्ट्रीय संघटन आहे. समाजाची संघटनात्मक ताकद दिवसागणिक वाढत असून मराठा समाजाचे अनेक दिग्गज नेते महासंघात काम करण्यासाठी येत आहेत. त्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास साधने शक्य होणार आहे. सर्वांनीच एकोप्याने आणि समन्वयाने काम करू या असे आवाहन हिंद मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष मराठा समाजाचे जेष्ठ नेते सदानंद भोसले यांनी केले आहे. हिंद मराठा समाजाचे नवनियुक्त कोकण प्रदेश अध्यक्ष निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण यांच्या पदग्रहण समारंभानिमित्त रविवारी सायंकाळी ६ वाजता पनवेल येथे आयोजित कार्यक्रमामध्ये भोसले उपस्थित मराठा बांधवाना मार्गदर्शन करित होते. राज्यातील बडोदे संस्थानचे परिवारातील हिंद मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष उज्ज्वलसिंह राजे गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

सदानंद भोसले यांनी मराठा समाजाच्या उकर्षासाठीच हिंद मराठा महासंघाची स्थापना करण्यात आली असून यातूनच समाजातील अनेक दिग्गज मराठा जोडले गेले आहेत.छत्रपती शिवराय आणि राजे सयाजीराव गायकवाड यांना अभिप्रेत असलेले समाज प्रबोधनाचे कार्य हिंद मराठा महासंघाच्या माध्यमातून सुरु झाले आहे. आता समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सर्व मराठा बांधवानी एकत्र येऊन संवाद व समन्वयाने काम करूया असे भावनिक आवाहन भोसले यांनी केले आहे. राजे उज्ज्वलसिंह राजे गायकवाड यांनी देशभरात शिवराय आणि सयाजीराव गायकवाड यांनी मराठा साम्राज्यासोबतच रयतेसाठी काम केले. त्याप्रमाणे आपणही मराठा समाजासाठी आदर्शवत काम करण्याचा प्रयत्न करू या असे आवाहन केले. यावेळी महासंघाचे राष्ट्रीय सचिव शिवाजीराव पालांडे, उद्योग व रोजगार विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र आंब्रे, गुजरात राज्याचे अध्यक्ष देवेश माने, बडोदा जिल्हा अध्यक्ष श्री.प्रदीप मोरे, गुजरातचे युवा अध्यक्ष समरजितसिंह राजे गायकवाड, आमदार उद्योजक वहाळ साई संस्थान अध्यक्ष लोकनेते रवीशेठ पाटील, इंटकचे अशोकराव मोरे, जयंत म्हात्रे, आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये सहायक पोलीस आयुक्त विनोदराव चव्हाण यांची कोकण प्रदेश अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. त्यांना संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले आणि राष्ट्रीय अध्यक्ष उज्ज्वलसिंह राजे गायकवाड यांच्या हस्ते नियुक्तीचे प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी समस्त मराठा बांधवानी श्री. विनोदराव चव्हाण यांच्या पोलीस सेवेतील कारकिर्दीतील उत्कृष्ट कामाचे कौतुक केले. यावेळी श्री. विनोद चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पोलीस सेवेत ३५ वर्षे काम केल्यानंतर आपण आता मराठा समाजासाठी काम करणार असून आपल्या अनुभवाचा पुरेपूर फायदा समाजाला मिळवून देणार असल्याचे त्यांनी सांगितले. हिंद मराठा महासनघाच्या माध्यमातून कोकणातील मराठा समाजाच्या आर्थिक व समाजिक विकासासाठी मी आपल्या सोबत आहे, आपण सर्वांनीच समन्वयाने काम करू अशी निसंदीगध ग्वाही चव्हाण यांनी दिली. यावेळी त्यांच्यासोबत त्यांची सुविद्य पत्नी उपविभागीय पोलीस अधिकारी विभाताई चव्हाण, आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये हिंद मराठा महासंघाचे नवे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून ऍड आनंद भोसले पुणे जिल्हाग्रामीण अध्यक्षपदी ॲड दिलीप पाटील तसेच प्रा संजय राव शिंदे यांची राज्य सल्लागार प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आल्याची माहिती सदानंदराव भोसले यांनी दिली.

## मुंबई तिकिट चेकिंग परिवार मुंबई तर्फे हिंदू नववर्ष स्वागताची शोभायात्रा

**दै.रायगड नगरी । माथेरान**



नेहमीच कामाच्या तणावातून सुद्धा आ-पली धार्मिक परंपरा कायमस्वरूप अबाधित ठेवून सण हा एखादा उत्सवाप्रमाणे साजरा करण्यासाठी मध्य रेल्वेत मुंबई येतील तिकिट चेकिंग परिवार तर्फे गुडीपाडव्याच्या पूर्व संध्येला दिनांक १ एप्रिल २०२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ऑडिटोरिअम येथे हिंदू नववर्ष स्वागत समारंभ व तिकिट चेकिंग स्टाफचा सन्मान पुरस्कार २०२२ आयोजित केला होता.

सकाळी निघालेल्या नववर्ष शोभायात्रेत मान्यवर अधिकारी शिवाजी सुतार, संदीप काळे, सारिका महोत्रा, वासुदेव मुदगलकर, जीवन गौरव पुरस्कार विजेते डी डी फडणीस व सौ दिपा फडणीस यांच्या हस्ते ऑफिसमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सुरवात करण्यात आली. नववर्ष शोभयात्रेत छत्रपती शिवाजी महाराज (अभिजित शिंदे), माँ जिजाबाई (चित्रा मयेकर), साईबाबा (सुहास ताम्हणकर), गांधीजी (दिपक पापन), संत तुकाराम (डी व्ही चिंदरकर), भारत माता (महालक्ष्मी), मावळे (प्रशांत घुंगरे, पी डी मोरे, रोहन पाटील, विशाल शिंदे, राहुल वाघमारे, अनिल करोसिया, तुतारी वादक व समस्त तिकिट स्टाफ भगवे फेटे बांधून सहभागी झाले होते. आ.आशिष शेलार यांच्या उपस्थित सुरझंकार हिंदू नववर्ष स्वागत गीतांचा कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली व त्यांचा सन्मान करण्यात आला. असे कार्यक्रम दरवर्षी करतजा आपले सण साजरे करतजा मी नेहमीच शुभेच्छा व आशिर्वाद देण्यासाठी येणार...! राधेकृष्ण मालिकेतील कृष्ण सुमेध वासुदेव मुदगलकर यांच्या आगमनाने सभागृह पूर्ण भगवामय झाले.. फोटो घेण्यासाठी गर्दी होऊ लागली.

## भरतीच्या पाण्याने होतेय शेतीची नासाडी दिवेआगर येथील यशवंती खारभूमीकडे शासनाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । शिस्ते**



श्रीवर्धन तालुक्यातील गेली दोन वर्षे चक्रीवादळ मुळे अगोदरच शेतकऱ्यांच्या बागायत व शेतीचे नुकसान झाले आहे. त्यातच शिस्ते - दिवेआगर मार्गावरील यशवंती खारभूमीलगत असणाऱ्या खाडीचे चे दरवाजे तुटल्याने समुद्राच्या भरतीचे पाणी शेतात घुसू लागले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना गेली तीन वर्षे भातशेतीला मुकावे लागत आहे.

दिवेआगर खाडी लगत बोर्लीपंचतन परिसरातील ४ ते ५ गावांतील अनेक शेतकऱ्यांची साधारण २०० ते ३०० हेक्टर क्षेत्रात खारशेती जमीन आहे. त्यात शेतकरी दरवर्षी भातशेतीचे उत्पन्न घेतात. समुद्राच्या खाडीतून शेतात समुद्राचे पाणी जाऊ नये यासाठी भक्कम दरवाजे असलेली 'सात उघडी' आहे. मात्र, गेली सलग तीन चार वर्षे उधाणाच्या भरतीमुळे हे दरवाजे उध्वस्त झाले. त्यामुळे शेतकऱ्यांची शेकडो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली जाते. पावसाळ्यात तर ही परिस्थिती गंभीर असते. हाताशी आलेली पिके उधानाच्या पाण्यामुळे नष्ट होतात. याबाबतीत अनेक वेळा आमदार अनिकेत तटकरे यांच्याकडे स्थानिकांनी लक्ष देण्याची मागणी केली. खारभूमी सर्व्हेक्षण व अन्वेक्षण विभागाकडून नुकतीच नवीन झडपे लावण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्यात आली मात्र त्या लाकडी स्वरूपातील आहेत. प्रत्यक्षात लावणीपूर्वी झडपा बसवणे आवश्यक होते सध्या लाकडी झडपा लावणार असल्याचे समजते आहे मात्र समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे लाकडी दरवाजे कसे टिकणार असा संतप्त सवाल शेतकरी विचारु लागलेत. खाऱ्या पाण्यामुळे शेतीची सुपीकता धोक्यात आली आहे.

## पेस्ट कंट्रोलसाठी आलेल्या इसमाने दागिन्यांची केली चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पेस्ट कंट्रोल साठी आलेल्या इसमाने घरात येऊन बेडरूममधील कपाटाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेल्या एक लाख ६० हजार रुपयांचे सोन्याचे गंठणची चोरी केल्याची घटना खांदा कॉलनी येथे घडली आहे. आरोपी विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

खांदा कॉलनी, सेक्टर ८ येथील सुप्रिया कांबळे यांचे पती तुषार यांनी घरांमध्ये कॉकरोज झाल्यामुळे शक्ती पेस्ट कंट्रोल, वाशी येथे फोनवर बुकिंग केले होते. २९ मार्च रोजी पेस्ट कंट्रोलसाठी त्यांच्या घरी एक इसम आला. त्याने पेस्ट कंट्रोलची फवारणी केली. व तो घरातून निघून गेला. त्यानंतर कपाटाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले सोन्याचे गंठण घालण्यासाठी सुप्रिया गेल्या असता ते सापडून आले नाही. गंठनचा घरामध्ये सर्वत्र शोध घेतला मात्र मिळून आली नाही. त्यामुळे पेस्ट कंट्रोल करण्यासाठी आलेल्या इसमाने गंठण चोरी केली असावी असा संशय त्यांना आला. त्याला बोलावून घेऊन त्याचे नाव विचारले असता त्याने रोशन जगजीवन सिंग (वय ३३, राहणार उत्तर प्रदेश) असे सांगितले. व चोरी केली नसल्याचे त्याने सांगितले. खांदेश्वर पोलीस ठाण्यात रोशन सिंग याच्याविरोधात सोन्याची गंठण चोरल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## आर्या वनौषधी संस्थेच्यावतीने गुढीपाडवा दिवस ' कडुनिंब दिवस ' म्हणून साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आर्या वनौषधी संस्थेच्यावतीने गुढीपाडवा हा दिवस ' कडुनिंब दिवस ' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मानवाने विश्वस्त म्हणून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आपल्या परिसरात कडुनिंबा सारख्या वृक्षांची लागवड करावी असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी केले होते.या आवाहनास पर्यावरण प्रेमींचा उदंड प्रतिसाद लाभला.अलिबाग,पेण,पनवेल, उरण,जळगाव,वेंगुर्ले,बोईसर येथे २७० कडुनिंबाची झाडे वाटप व लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमामध्ये साक्षी राऊत (चांदोरकर), चंद्रकांत घोणे, हेमा पांचाळ, शशिकांत म्हात्रे, समीर पाटील, श्रीविद्या सरोदे, डॉ.अशोक तांबेकर, आयकर विभाग स्थानिक लोकाधिकार समितीचे सह कार्याध्यक्ष नंदू खोत, जयंत पाखरे, मोहन पाटील, हेमंत म्हात्रे, जनार्दन पाटील, चेतन पाटील, विणा म्हात्रे, मिताली गुरव आदी मान्यवरांसह निलेश घोणे, ओम पांचाळ, संपदा पोंगडे, सीमा शेडगे, प्रसाद शेडगे, परी शेडगे, शुभ्रा शेडगे, सुमित्रा पोंगडे, संदीप पोंगडे, रंजना मेंगाळ, बाबू मेंगाळ, उमेश मेंगाळ, जनाबाई पिंगळा, उल्का पिंगळा, राखूबाई मेंगाळ, मंगेश पिंगळा, जानकी पवार, अंश पाटील, पिंट्या गायकवाड ग्रुप आदी पर्यावरणप्रेमी सहभागी झाले होते. यावेळी आर्या वनौषधी संस्थेच्यावतीने कडुनिंबाच्या औषधी गुणधर्माची माहिती असलेली पत्रके वनौषधी प्रेमींना भेट देण्यात आली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.

